## मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रा. कु. सुधा विष्णू हुकेरी, मिरज ह्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली संशोधन करून " तत्त्वज्ञ कालिदास " हा लघु-शोधप्रबंध एम्. फिल् पदवीसाठी तयार केला आहे.

विजय इनामदार

"अद्वैत" [ डॉ. वि. बा. इनामदार ]

विश्रामबाग, मान्यताप्राप्त संशोधन मार्गदर्शक,

सांगली ४१६४१५. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

दिनांक : १६ डिसेंबर १९८३

# DECLARATION

It is hereby declared that the work reported in this dissertation is original and to the best of my knowledge, no such work has been submitted for any diploma or degree in this or any other University.

( Dr. V.B.Inamdar )
Research Guide

( Miss. S.V.Hukeri )
Candidate

Sangli.

Date : 16th Dec-1993.

# - आभार -

" तत्त्वज्ञ कालिदास " हा लघु-शोधप्रबंध लिहिण्यासाठी ज्या ज्या व्यक्तींचे आशीर्वाद, प्रेरणा, प्रोत्साहन आणि सहकार्य मला मिळाले त्या त्या व्यक्तींचे आभार मानणे हे मी माझे आद्य कर्तव्य समजते.

सर्वप्रथम माझे मार्गदर्शक गुरुवर्य डॉ. वि. बा. इनामदार यांची मी अत्यंत ऋणी आहे. कारण त्यांच्या मार्गदर्शनामुळेच मी हे शोधकार्य पूर्ण करु शकले.

याबरोबरच कन्या महाविद्यालय, मिरज चे माजी प्राचार्य भा. श्रं. वैद्य, लालबहाद्दूरशास्त्री महाविद्यालय, सातारा, येथील संस्कृत विभाग प्रमुख डॉ. आर. ह. साळुंखे, डॉ. राजेभोसले, प्रा. सौ. अनुराधा प्र. कुलकर्णी यांनीही वेळोवेळी जी मदत मला केली त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

तसेच माझ्या शोधकार्यात सर्वप्रकारे सहकार्य करणा-या अनेक संस्थांची मी ऋणी आहे. यामध्ये मुख्यत्वेकरून कन्या महाविद्यालय, मिरज, विलिंग्डन महाविद्यालय, सांगली, मिरज विद्यार्थी संघ, यांचा उल्लेख करावा लागेल. या संस्थानी लागतील ते ग्रंथ अभ्यासासाठी देऊन मला उपकृत केले आहे.

याखेरीज आई-वडिलांचे आशीर्वाद, पतीचे आणि भावाचे सहकार्य, तसेच घरच्या व बाहेरच्या अनेक व्यक्तींचे सहकार्य यामुळेच मी हा लघु-शोधप्रबंध पूर्ण करु शकले. त्या सर्वांचीच मी आभारी आहे.

प्र. कु. सुधा विष्णू हुकेरी.

# अनुक्रमणिका


| | पृष्ठांक |
|---|---|
| प्रस्तावना | |
| प्रकरण पहिले - कालिदासाच्या काव्यातील सांप्रदायिक तत्त्वज्ञान. | १ |
| प्रकरण दुसरे - कालिदासाचे जीवनविषयक तत्त्वज्ञान. | २९ |
| १] कालिदासाचे प्रेमविषयक तत्त्वज्ञान. | ३० |
| २] कालिदासाचे स्त्रीविषयक विचार. | ५० |
| ३] " सौंदर्यविषयक तत्त्वज्ञान. | ७३ |
| ४] " शिक्षणविषयक तत्त्वज्ञान. | ८३ |
| ५] " अलंकार व तत्त्वज्ञान. | ९९ |
| ६] जीवनातील सज्जनपणाचा शोध. | १०३ |
| ७] जीवनातील दैवाचे स्थान. | १३२ |
| ८] संकीर्ण. | १४८ |
| प्रकरण तिसरे - उपसंहार. | १७५ |
| संदर्भसूची | |


SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR ... LIBRARY

## प्रस्तावना

महाकवि कालिदास ! ज्याने आपल्या अलौकिक बुध्दिमत्तेने , विद्वत्ताप्रचुर तरीही मनमोहक साहित्याने संपूर्ण जगाला मोहित केले, आणि त्यांच्याकडून मानाचा मुजरा मिळविला असा महाकवि. रसिकांच्या मनामध्ये आदराचे एक अढळ स्थान मिळविणाऱ्या या कवीला जी कीर्ती आणि लोकप्रियता जनमानसांत मिळाली, तसे भाग्य क्वचितच कोणाच्या वाटणीला आले असेल. साहित्यक्षेत्रातील अनेक विद्वानांनी त्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. "उपमा कालिदासस्य" म्हणून कोणी उपमेच्या क्षेत्रातील त्याचे अग्रेसरत्व सिध्द केले आहे, तर कोणी "वैदर्भरीतिसन्दर्भे कालिदास: प्रगल्भते" किंवा "वैदर्भी कविता स्वयं वृतवती श्रीकालिदासं वरम् ।" म्हणून वैदर्भी रीतीच्या बाबतीत त्याचे अतुलनीयत्व व्यक्त केले आहे.

एकंदरीत पाहता ज्याच्या विद्वत्तेबद्दल आणि अग्रगण्यतेबद्दल विद्वानांच्यात दुमत नाही म्हणूनच "एकमेवाद्वितीय" म्हणणेच ज्याच्या बाबतीत सार्थ ठरेल असा महाकवि म्हणजे कालिदास होय. "कवि" हा शब्द दोन अर्थांनी संस्कृत साहित्यात ओळखला जातो. "विद्वान" आणि "काव्य रचणारा" या दोनही अर्थांनी कालिदास हा फक्त कवीच नाही तर तो महाकवि आहे.

तसे पाहता त्याची ग्रंथसंपत्ती मोजकीच. मालविकाग्निमित्रम्, विक्रमोर्वशीयम् आणि अभिज्ञानशाकुन्तलम् ही तीन नाटके, कुमारसंभवम् आणि रघुवंशम् ही दोन महाकाव्ये, मेघदूतम् हे खंडकाव्य आणि ऋतुसंहारम् हे लघुकाव्य. पण हे अवघे सात ग्रंथ म्हणजे संस्कृत साहित्यातील सात अद्भुत दालनेच होत. ज्यातील प्रत्येक दालन उघडले असतां प्रचंड ज्ञानभांडार आपल्या हाती लागेल. या ज्ञानभांडारांनी रसिकांची मने उजळून टाकलेली

आहेत, आणि त्यांना एका चिरकालिक आनंदाचा लाभ करून दिला आहे. त्याचे हे साहित्य यापुढेही रसिकांना असेच आनंद देत राहील यात मुळीच शंका नाही.

जवळजवळ कालिदासाचे सर्वच ग्रंथ लोकप्रिय झाले असले, तरी अभिज्ञानशाकुन्तलम्, मेघदूतम् आणि रघुवंशम् या तीन ग्रंथानी अफाट लोकप्रियता मिळवून दिली, आणि त्याचे नांव सतत रसिकांच्या ओठी खेळते ठेवले हे निश्चित. अभिज्ञानशाकुन्तलाने कालिदासाची कीर्ती पाश्चात्य जगांत पसरविली, तर रघुवंशामुळे "रघुकार" म्हणून त्याचा नांवलौकिक झाला, आणि आकाशाला ,गवसणी घालणा-या त्याच्या कल्पनेचा विलास, त्याची सौंदर्यग्राहकता पहावयाची असेल तर मेघदूताखेरीज दुस-या कशाचे नांव घेता येईल ? कालिदासाच्या मुख्यत: या तीन आणि पर्यायाने सर्वच ग्रंथांनी त्याला अजरामर केले.

आता प्रश्न असा निर्माण होतो कीं, आज जवळ जवळ दोन हजार वर्षे कालिदासाने रसिकांची मने नुसती आकृष्टच केली नाहीत तर काबीज केली आहेत याचे कारण काय ? त्याच्या ग्रंथात अशी काय जादू आहे कीं, जिने रसिकांना इतके मोहविले आहे ? माझ्याप्रमाणेच अनेकांच्या मनामध्ये हा प्रश्न सतत घोळत असला पाहिजे. या प्रश्नाच्या अनुरोधाने कालिदासाच्या ग्रंथांच्याकडे मी बारकाईने पाहिले असतां एक गोष्ट मुख्यत्वेकरून माझ्या निदर्शनास आली, ती म्हणजे बदलत्या काळाच्या प्रचंड ओघात वाहून न जाणारी कांही शाश्वत मूल्ये त्याच्या ग्रंथात आहेत, जिने कालिदासाचे साहित्य चिरकालिक केले आहे. या शाश्वत मूल्यानांच आपण सुभाषिते म्हणतो. यादृष्टीने पाहतां कालिदासाचे ग्रंथ म्हणजे सुभाषितांची भांडारेच होत. या सुभाषितांच्या द्वारा कालिदासाने जीवनाचे जणूं तत्त्वज्ञानच मांडले आहे. कोणत्याही गोष्टीचा उथळपणे विचार न करतां त्याच्या अंतरंगात शिरणे आणि त्यातील सत्य शोधून काढणे हा कवीचा स्वभाव यावरून आपल्याला दिसून येतो. आणि ही

सत्यान्वेषणी वृत्ती हीच त्याच्या चिरकालिक यशाचे गमक असल्याचे मला उमगले. म्हणून "यावत् स्थास्यन्ति गिरय: सरितश्च महीतले । तावद् रामायणकथा भूतले प्रचरिष्यति ।।" ही रामायणाच्या संदर्भातील उक्ती कालिदासाच्या बाबतीतही लागू पडणारी आहे असे मला वाटते.

कालिदासाच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक पैलूंचा विचार आजपर्यंत अनेक साहित्यकारांनी केला आहे. निसर्गकवि म्हणून त्याला कोणी संबोधिले आहे, तर कोणी सौंदर्योपासक म्हणून त्याची स्तुती केली आहे, नाटककार म्हणून कोणी त्याला अभ्यासिले आहे, तर कोणी महाकवि म्हणून गौरविले आहे. पण "तत्त्वज्ञ कालिदास" म्हणून क्वचितच कोणी त्याचे परीक्षण केले असेल. तेव्हा "तत्त्वज्ञ" या दृष्टीकोनातून मी कालिदासाचे संशोधन करणार आहे. कारण कालिदास नाटककार, महाकवि निसर्गकवि इ. विशेषणांनी रसिकांच्या चिरस्मरणात राहिला तो त्याच्या या "तत्त्वज्ञ" वृत्तीमुळेच होय.

कालिदासाच्या तत्त्वज्ञानाचा विचार दोन प्रकारे केला आहे.

१] सांप्रदायिक तत्त्वज्ञान.

२] जीवनविषयक तत्त्वज्ञान.

प्रा. कु. सुधा विष्णु हुकेरी.

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR